राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांची वीज देयके संयुक्त बिलिंग (Composite Billing) प्रणालीद्वारे महावितरण कंपनीस अदा करण्या करीता वार्षिक देयकांची आगाऊ रक्कम रू. २७५.०० कोटी महावितरण कंपनीस वितरीत करणेबाबत (लेखाशिर्ष-२८०१६१६५)

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुरमा-२०२६ /प्र.क्र. २७० /ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १. उ. ऊ. का व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२६ /प्र. क्र. १००/ऊर्जा-५ दि. १६ मार्च, २०२६.
२. उ.ऊ. का व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२६ /प्र.क्र.१००/ऊर्जा-५ दि. १७ जून, २०२६.

प्रस्तावना :-

वित्तीय शिस्त, पारदर्शकता, ऊर्जा कार्यक्षमता, प्रशासकीय सुधारणा आणि राज्य शासनाच्या खर्च नियंत्रणासाठी शासकीय वीज बिलांचा संयुक्त बिलिंग (Composite Billing) प्रणालीद्वारे केंद्रीकृत भरणा करणे हा सर्वोत्तम उपाय ठरू शकतो, म्हणून संयुक्त बिलिंग (Composite Billing) प्रणालीचा शासकीय पातळीवर अवलंब करुन राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांची वीज देयके केंद्रीकृत पद्धतीने अदा करण्याबाबतच्या प्रशासकीय सुधारणेस शासन निर्णय दि.१६.०३.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांच्या वीज जोडण्या १ एप्रिल, २०२६ पासून प्रिपेड पध्दतीमध्ये बदलण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या सर्व शासकीय कार्यालयांची वीज देयके संयुक्त बिलिंग (Composite Billing) प्रणालीद्वारे अदा करण्याच्या अनुषंगाने वार्षिक देयकांची आगाऊ रक्कम महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२६ चे दुसरे अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. ४०००.०० कोटी निधीची ऊर्जा विभागाकरीता तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने सदर मंजूर रु.४०००.०० कोटी निधी वितरित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने रू. २७५.०० कोटी निधी तात्पुरते अनुदान म्हणून (Adhoc Grant) वितरित करण्यास मान्यता दिली असून सदर निधी बिम्स प्रणालीवर उपलब्ध करून दिला आहे. सदर रू. २७५.०० कोटी निधी महावितरण कंपनीस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य शासनाच्या सर्व शासकीय कार्यालयांची वीज देयके संयुक्त बिलिंग (Composite Billing) प्रणालीद्वारे अदा करण्याच्या अनुषंगाने वार्षिक देयकांची आगाऊ रक्कम महावितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पित करण्यात

आलेला रू. ४०००.०० कोटी निधी पैकी रू. २७५.०० कोटी (रू.दोनशे पच्याहत्तर कोटी फक्त) इतका निधी तात्पुरते अनुदान म्हणून (Adhoc Grant) महावितरण कंपनीस वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे, त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा महावितरण कंपनीने करावी.

वरील बाबींचा खर्च "मागणी क्र.-के-०६, मुख्य लेखाशिर्ष-२८०१ वीज, उप मुख्य लेखाशिर्ष- ०५ पारेषण व वितरण, गौण शिर्ष- १०६ वीज प्रणाली विकास- राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र, गट शिर्ष - ००, उपगट शिर्ष- (००)(०१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यास शासकीय कार्यालयांची वीज देयकांची रक्कम अदा करण्याकरीता (कार्यक्रम) (२८०१६१६५), उद्दिष्ट- ३१,सहाय्यक अनुदान" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्यामार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीमती अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३) आणि नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. नारायण कराड, सह सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी सदर मंजूर झालेली रक्कम रुपये २७५,००,००,०००/- (रुपये दोनशे पंच्याहत्तर कोटी फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (खाते क्र.६०३५५७५६२६१) येथून आहरित करुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचे नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित अथवा NEFT/RTGS Fund Transfer द्वारे हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी.

या लेखाशिर्षांतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर देयक हे बिनशर्त असून, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३०६/२०२६/व्यय-१६, दि.२४.०७.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार, निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०८१४११४८१६६०५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN
SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2026.08.14 11:50:01 +05'30'

(नारायण कराड)
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवा कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (अपारंपारीक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई३२-.
९. सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
१०. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२.
१२. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट ,मुंबई.
१६. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
१८. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
२१. कार्यासन अधिकारी (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२२. कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३. कार्यासन अधिकारी (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
२४. कार्यासन अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२५. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२६. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.